# शेख नसरुद्दीनचा घोडा

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

शेख नसरुद्दीन उत्तर भारताच्या लखनऊ शहरातील गल्लीबोळांमधून घाईघाईने चालत निघाला होता, त्यावेळी रणरणता गोलाकार सूर्य अगदी डोक्यावर आला होता. नसरुद्दीन एका महत्त्वाच्या कामासाठी निघाला होता आणि ते महत्त्वाचे काम होते घोडा विकत घेणे. याआधी त्याच्याकडे कधीही घोडा नव्हता, परंतु अशा रणरणत्या उन्हात आणि नजिक येऊन ठेपलेल्या पावसाळ्यासाठी घोडा हे प्रवास करण्यासाठीचे व स्वतःच्या मुक्कामस्थळी पोहोचण्यासाठीचे सर्वोत्तम साधन होते.

अखेरीस, नसरुद्दीन घोड्याच्या व्यापाऱ्याला जेव्हा घोड्यांच्या तबेल्यात भेटला, तेव्हा त्यांच्यात अगदी कमी वेळासाठीच बोलणे झाले. नसरुद्दीनने त्या व्यापाऱ्याला नाण्यांनी भरलेली एक मोठी पोटली दिली आणि व्यापाऱ्याने घोडा बाहेर आणला. तो घोडा विशालकाय आणि बलवान होता, त्याची तपकिरी कातडी सूर्यप्रकाशात चमकत होती.

घोड्याला पाहून नसरुद्दीनचे डोळे औत्सुक्याने मोठे झाले. आणि तो व्यापारी काही बोलण्याआधी आणि त्याने नसरुद्दीनला त्याच्या या नवीन असाधारण जबाबदारीविषयी परिचित करण्याआधीच — नसरुद्दीनने त्या घोड्याची मान पकडली आणि स्वतःहूनच त्याने घोड्याच्या पाठीवर चढून बसायला सुरुवात केली.

“थांब — थांब, अरे, हे कसे करायचे ते मला जरा दाखवू तर दे!” व्यापारी ओरडून म्हणाला.

नसरुद्दीन, कसेतरी करून वेंधळ्यासारखा घोड्यावर चढला आणि व्यापाऱ्याचा निरोप घेऊन जायला निघाला. तो म्हणाला, “मी ठीक आहे, पाहा?” तशी त्याला अगदी *थोडीशीच* तर धाप लागली होती.

नसरुद्दीनने घोड्याला पायाने हलकेच टाच मारली आणि लवकरच ते दोघे रस्त्यावर वेगाने धावू लागले.

“अरे, थांब जरा !” व्यापारी नसरुद्दीनच्या मागे धावत जात पुन्हा म्हणाला. “इकडे परत ये! तुला घोड्यावर स्वार होता येते काय?”

“ओह, त्याचे प्रशिक्षण तर मी घेतलेले नाही,” नसरुद्दीन चिंतित स्वरात म्हणाला. “पण ते असे कितीसे कठीण असणार?”

आणि मग चेहऱ्यावरील एका उपहासपूर्ण हास्यासह नसरुद्दीन आपल्या घोड्यावर बसून शहराच्या दिशेने निघून गेला. ते दोघे अनेक दुकानांच्या आणि गाळ्यांच्या जवळून गेले. थोड्याथोड्या वेळाने घोडा यांतील एखाद्या गाळ्याजवळ थांबायचा, कुतूहलाने आजुबाजूला पाहायचा आणि कधीकधी काही वस्तूंचा वासही घ्यायचा.

काही वेळानंतर, नसरुद्दीन आणि त्याचा घोडा एका दुकानाजवळ आले जिथे अन्नधान्य आणि खाण्याच्या इतर गोष्टी विकायला ठेवलेल्या होत्या. ते दुकान गोड आंब्यांनी, गुलाबी सफरचंदांनी, उसाच्या तुकड्यांनी आणि हिरव्या भाजीपाल्याने भरलेले होते. दुकानाच्या समोर तपकिरी रंगाची मोठी पोती एका रांगेत ठेवलेली होती, ज्यांतील प्रत्येक पोते वेगवेगळ्या बियाण्यांनी, धान्यांनी किंवा डाळींनी भरलेले होते.

घोड्याने तिथे ठेवलेल्या इतक्या साऱ्या अन्नावर एक नजर फिरवली आणि — मग काय! — तो सरळ त्याकडे पळत सुटला. दुकानाच्या जवळ पोहोचल्यावर लगेचच त्याने आपले डोके चण्याच्या पोत्यात खुपसले.

नसरुद्दीनचा विश्वासच बसेना, तो आपला पाहतच राहिला आणि घोडा चावून-चावून खात राहिला. *त्याने,* असा कधी विचारच केला नव्हता की, घोडा अशा प्रकारे अचानक झेप घेईल! नशीबाने, त्याने अगदी वेळेत घोड्याच्या मानेवरील केस अशा पद्धतीने पकडले की, ज्यामुळे तो बालंबाल वाचला, नाहीतर तो घोड्यावरून जवळजवळ खालीच पडणार होता.

“अरे! ए!” आपल्याच विचारांच्या तंद्रीत हरवलेला नसरुद्दीन, त्याच क्षणी ऐकलेल्या एका रागीट आवाजाने तंद्रीतून एका झटक्यासरशी बाहेर आला. तो आवाज जवळूनच कुठुनतरी येत होता.

“काय करतो आहेस तू?” तो चिडून ओरडण्याचा आवाज पुन्हा आला. “थांबव ते!”

नसरुद्दीनने वळून पाहिले असता त्याला दिसून आले की, त्या दुकानाचा मालक धावतच त्याच्याकडे येतो आहे. त्याचे डोळे क्रोधाने मोठे झाले होते आणि आपल्या हातातील एक लांब, पातळ काठी गोल फिरवत तो येत होता.

“दूर व्हा माझ्या चण्यांपासून! तो माणूस जोराने ओरडला.

काय घडते आहे हे नसरुद्दीनला कळायच्या आत, तो माणूस आपली काठी घोड्याच्या दिशेने फिरवू लागला. एकदा, दोनदा, तीनदा असे त्याने घोड्याच्या बगलेत — *जोराने* — काठीने वार केले.

बिचाऱ्या घोड्याने जोराचा हिसका देत आपली मान पोत्यातून बाहेर काढली. चणे सर्वदूर पसरले. घोडा दुकान मालकाच्या हातातील छडी पाहताच घाबरून खिंकाळला. तो माणूस आता मात्र रागाने अधिकच क्रुद्ध झाला होता, कारण पसरलेले ते सर्व सामान आता त्यालाच साफ करावे लागणार होते. थोडे थांबून की, हा माणूस आता पुढे काय करणार आहे हे पाहण्याऐवजी घोड्याने आपले पुढील पाय वरच्या बाजूला झाडले आणि तिथून पोबारा केला.

वेगाने, आणखी अधिक वेगाने घोडा पळतच राहिला, जेणेकरून जितके शक्य होईल तितके दुकानदारापासून त्याला लांब जाता यावे. त्याचे खूर धूळीने आणि मातीने माखलेल्या रस्त्यावर खट-खट आवाज करत होते. दुर्दैवाने, या आवाजानेच घोड्याला अधिकच उत्तेजित केले — ज्यामुळे तो आता अधिकच वेगाने धावू लागला.

घोडेस्वाराचा विचार करता. . . शेख नसरुद्दीन आतापर्यंत घोड्याच्या पाठीवर उपडा पडला होता आणि स्वतःचा जीव वाचवण्यासाठी घोड्याच्या मानेला घट्ट पकडून लटकत राहिला होता. नसरुद्दीन चिंतातूर होऊन लगाम शोधू लागला, जेणेकरून घोड्याचा वेग कमी करून तो त्याला नियंत्रित करू शकेल. परंतु आपल्या खालच्या बाजूस त्याला त्या प्राण्याच्या भल्या मोठ्या पाठीचा स्पर्शच काय तो फक्त जाणवत होता. शेवटी, त्याच्या लक्षात आले : खरेतर तिथे लगामच नव्हता. तो व्यापारी त्याला लगाम देईपर्यंत त्याने वाटच पाहिली नव्हती.

त्याच क्षणी तो घोडा अचानक वळला आणि नसरुद्दीनच्या हाताची उरलीसुरली पकडदेखील आता सुटली; त्याला त्याच्या जागेवरून ढकलून दिले गेले होते. त्याला हे कळायच्या आतच तो घोड्याच्या एका बाजूने घसरत जाऊन खालच्या बाजूला पोहोचला होता — आणि आता तो कसातरी, मोठ्या मुश्किलीने घोड्याच्या *खालच्या बाजूला* होता आणि त्याने स्वतःच्या आपोआप वर उचलल्या केलेल्या हातांनी घोड्याची मान पकडली आणि आपल्या पायांनी घोड्याच्या शरीराला.

घोडा, जो कदाचित घोडेस्वाराच्या दुर्दशेविषयी अनभिज्ञ होता किंवा ज्याला त्यामुळे काहीही फरक पडत नव्हता, तो पळतच राहिला. लवकरच ते एका दुसऱ्या बाजारातून जात होते. त्यांच्या आजुबाजूला गर्दी जमा होऊ लागली; घोड्याचे असे अनियंत्रितपणे पळणे, त्याची ही अशी बेभान चाल स्वाभाविकपणे लोकांना हे सर्व पाहण्यासाठी लोकांना बाध्य करत होती. दृश्य अधिक चांगले दिसावे म्हणून लोक आणखी जवळजवळ येत राहिले होते आणि एकमेकांना कोपराने ढोसत त्याच्याकडे इशारा

करत होते, त्यांच्या चेहऱ्यावर एकाच वेळी मनोरंजनाच्या आणि चिंतेच्या भावांचे मिश्रण दिसत होते. काय, घोड्याच्या खालच्या भागाला *एक माणूस* लटकतो आहे?

त्यातील एक व्यक्ती गर्दीला बाजूला सारत पुढे आली. “तो माझा मित्र आहे!” ती व्यक्ती ओरडली. “तो तर नसरुद्दीन आहे!”

“अरे नसरुद्दीन!” त्याने हाक मारली. “हे काय चालले आहे? तू कुठे निघाला आहेस?”

काही काळ जणूकाही सर्व काही थांबून राहिले. आणि मग, घोड्याखालून शेख नसरुद्दीनचा दबका स्वर आला : “मला माहिती नाही,” तो कण्हत म्हणाला. “घोड्यालाच विचार!”

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.